# पहिले पान

संपादक : डॉ. रेखा जगनाळे






दि. ०१ मार्च ते दि. ३१ मार्च २०१८

सौ. अनिषा दुरगकर
टंकलेखन

**सुविचार :**

आपल्या प्रतिष्ठेचा खूप चांगला सांभाळ करा कारण हिच गोष्ट अशी आहे जिचे वय तुमच्यापेक्षा ज्यास्त आहे.

Institution has developed its vision and mission.
The **vision** of the Institution is “**Determined for excellence in Social Work Education**”.
The **Mission** of the Institution is
We at BPNISW shall work continuously to achieve-

1. To impart quality social work education 2 To introduce newer areas of academic pursuit with grater employability potential
3. To introduce core values of higher education with a view to bring about holistic development to personality
4. Providing Social Work Education for both personal and social transformation
5. Providing means for the up-gradation of skills in order to increase the employability of the college students.

Core values:

- An unwavering faith in Human dignity An abiding faith in duty towards other individuals and society

The vision and mission of the institution is communicated to the students, teachers, staff and other stakeholders through its publication in the prospectus, institutional website, advertisement in newspapers, Orientation programme and through Alumni Association of the institute. The vision and mission of the institution is in tune with the National Education Policy, 1986. The nature of social work is such that there occurs holistic development of personality of the students. The social work syllabus is reviewed and updated periodically. In addition to this, the institution offers value added courses, innovative courses, and modular courses for the total development of personality. These courses definitely enhance the employability of the students. bridge courses; value added courses, innovative courses, and modular courses for the total development of personality. These courses definitely enhance the employability of the students.

## महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना 3 दिवसीय प्रशिक्षण:–



नॅशनल सर्व्हिस स्किम आणि नॅशनल सर्व्हिस डिफेन्स महाविद्यालय आयोजित 3 दिवसीय ट्रेनिंग प्रोग्राम ‘कॅपॅसिटी बिल्डिंग ट्रेनिंग इन डिझास्टर रिक्स रेसिलीन्स’ या विषयावरील प्रशिक्षण कार्यक्रमात 5 मार्च ते 7 मार्च 2018 या काळात महाविद्यालयतील विद्यार्थी अंजली दोंतुल, मनुकुमार शाहु, रंजना मिरे, अंकिता सरोदे, हे विद्यार्थी प्रशिक्षणार्थी म्हणून सहभागी होते.

## ग्रंथालय उपक्रम कार्यक्रमात स्वलिखित पुस्तकावर भाष्य



दि. 13 मार्च 2018 रोजी महाविद्यालयातील स्व. ईश्वर देशमुख मेमोरिअल ग्रंथालय उपक्रमात Book Talk (पुस्तकांवर भाष्य) डॉ. नंदा पांगुळ यांनी स्वतः लिहिलेल्या ‘संस्कार’ या ग्रंथाच्या निर्मिती मागची भूमिका विषद केली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयाच्या ग्रंथपाल डॉ. पौर्णिमा गंथडे यांनी केले. कार्यक्रमात महाविद्यालयातील बी.एस.डब्ल्यू. भाग 1 चे विद्यार्थी उपस्थित होते.



**आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा सहभाग:**

दि. 5,6,7 मार्च 2018 या काळात महाविद्यालयातील आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रमात एम.एस.डब्ल्यू.1 च्या मिरे, सरोदे, दोंतुल, नारनवरे या विद्यार्थ्यांनी प्रशिक्षणात सहभाग घेतला.



**एम.एस.डब्ल्यू.1 च्या विद्यार्थ्यांचा अनौपचारिक स्नेहसंमेलन :**

दि. 26 मार्च 2018 ला महाविद्यालयात एम.एस.डब्ल्यू. भाग 1 च्या विद्यार्थ्यांचा अनौपचारिक स्नेहसंमेलन महापिद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल.एस. तुळणकर यांच्या अध्यक्षतेखाली व वर्ग शिक्षक प्रा. डॉ. विलास घोडे तसेच नागरिक शिक्षण मंडळाचे सदस्य डॉ. दिलिप बारहाते, यांच्या उपस्थितीत घेण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी शिक्षकांबद्दलचे आपआपले अपुभव कथन केले.यातून महाविद्यालयाला विद्यार्थ्यांमार्फत एकूणच महाविद्यालयाबद्दल व शिक्षकांबद्दल माहिती मिळाली. महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले व विद्यापीठ परिक्षेकरिता शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे संचालन नंदकिशोर धाडसे यांनी केले.



**बी.एस.डब्ल्यू. भाग 1 च्या विद्यार्थ्यांचे औपचारिक स्नेहमिलन**

दि. 27 मार्च 2018 रोजी बी.एस.डब्ल्यू. भाग 1 च्या विद्यार्थ्यांचा **औपचारिक स्नेहमिलन** हा कार्यक्रम महाविद्यालयात डॉ. अनंत बरडे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच वर्गशिक्षिका प्रा. डॉ. नंदा पांगुळ, प्रा. अनिल सरगर, डॉ. विलास घोडे यांच्या उपस्थितीत पार पडला.

याप्रसंगी विद्यार्थ्यांनी वर्षभरातील शिक्षक व महाविद्यालयाविषयी असलेले मत व्यक्त केले ब-याच विद्यार्थ्यांनी स्वानुभव कथन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अश्विनी डोये या विद्यार्थ्यांनी केले.

**जागतिक महिला दिनानिमित्त ऑटोचालक महिलांचा सत्कार व प्रकट मुलाखत :**



दि. 8 मार्च 2018 रोजी जागतिक महिला दिनाकनमित्ताने नागपूरातील महिला ऑटोचालक महिलांचा सत्कार व प्रकट मुलाखतीचा कार्यक्रमाचे आयोजन केले गेले. याप्रसंगी राज्य महिला आयोगाच्या सदस्या नीता ठाकरे, ॲड. डॉ. रेखा बारहाते, डॉ. साधना थोटे यांच्या उपस्थितीत, सत्कारमूर्ती बेबी रामटेके, वंदना सोनटक्के यांचा सत्कार पाहुन्यांच्या शुभ हस्ते करण्यात आला.

तद्नंतर सत्कारमूर्तीची प्रकट मुलाखत डॉ. नंदा पांगुळ व डॉ. रेखा जगनाळे यांनी घेतली. यावेळी सत्कारमूर्ती रामटेके व सोनटक्के यांनी आपले अनुभव कथन केले. महिला आर्थीकदृष्टया सक्षम राहिल्या तर त्यांना घरातील प्रत्तेक गोष्टीत अधिकार मिळतील, व हेच महिला सक्षमीकरनाच्या दृष्टीने पुढचे पाऊल ठरेल.असे मत नीता ठाकरे यांनी व्यक्त केले. ॲड. रेखा बारहाते महिला कायदेविषयक समृध्द ज्ञानाने सक्षम होऊ शकतील असे मत व्यक्त केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत तुळणकर यांच्या प्रोत्साहाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले हाते. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन विना डोंगरवार व आभार प्रदर्शन रुक्मीनी भलावी या विद्यार्थीनीनी केले. तसेच राजश्री जांभुळकर, व नंदकिशोर धाडसे यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता परिश्रम घेतले. या कार्यक्रमात शिक्षक – शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संखेने उपस्थित हाते.

**महाविद्यालयात लोकमत तर्फे व्यक्तिमत्व कार्यक्रम संपन्न:**

दि. 7 मार्च 2018 रोजी डॉ. विलास घोडे यांनी लोकमत समुहाच्या मदतीने व्यक्तित्व किंवा व्यक्तिमत्व विषयावर कार्यक्रमाचे आयोजन केले. याप्रसंगी श्री. सैनी व डायरेक्टर श्री. प्रमोद पारधी यांनी विद्यार्थ्यांना विद्यार्जनाबरोबरच व्यक्तिमत्वाचा विकास कशा प्रकारे करता येऊ शकतो. याचे वेगवगळया कौशल्य (Skill) वापरून व्यक्तिमत्व कसे बदलता येते. 21 व्या शतकाच्या उंबरठयावर व जागतिकीकरणाच्या अनुषंगाने कसे आवश्यक आहे यांचे मार्गदर्शन केले.





## नॅक सभासदांना मार्गदर्शन :–

महाविद्यालयातील नॅक कमिटीच्या सदस्यांना मार्गदर्शन देण्याकरिता दि. 30/03/ 2018 रोजी प्रा.बागुल, उमरेड येथून आले होते. प्राचार्य डॉ. एल.एस.तुळणकर यांनी प्रा. बाबुल यांचे शब्दसुमनांनी स्वागत केले. प्रा. बाबुल यांनी एस.एस.आर. पाठविण्याकरिता केलेले मागदर्शन महत्वपूर्ण ठरले. यावेळी त्यांचे आभार नॅक कोर्डिनेटर डॉ. सिमा लोबो यांनी मानले.